महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
**पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५**
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेल: roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/1131 दिनांक : 15/10/2020

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी/पद्व्युत्तर पदवी संस्था
औरंगाबाद विभाग.

विषयः- **उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रातील संस्थांमध्ये Research Scholar (Ph.D) व Post Graduate Students यांना Laboratory/Experimental Works करण्यासाठी आवश्यक कार्यपध्दती (SOP) बाबत.**

संदर्भः- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रं.२अ/एडीएम/२०२०/२८६, दिनांक १५.१०.२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १४.१०.२०२० रोजी प्रसिध्द केलेल्या Easing of Restrictions and Phasewise opening of Lockdown (Mission Begin Again) अंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रातील संस्थांमध्ये Research Scholar (Ph.D) व Post Graduate Students यांना जिथे Laboratory/Experimental Works करणे आवश्यक आहे त्यांना दिनांक १५.१०.२०२० पासून परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर परवानगीच्या अनुषंगाने, संबंधीत विद्यार्थ्यांसाठी कोवीड-१९ च्या पार्श्वभूमीवर अंमलात आणावयाची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झाली असुन, संदर्भीय पत्र सोबत पाठविण्यात येत आहे. पत्रातील सूचना व प्रमाणित कार्यपध्दतीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,

ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२०/२८६ दिनांक : 15 OCT 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर

विषय : उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रातील संस्थांमध्ये Research Scholar (Ph.D) व Post Graduate Students यांना Laboratary / Experimental Works करण्यासाठी आवश्यक कार्यपध्दती (SOP) बाबत...

संदर्भ : शासन आदेश महसूल व वने ,आपत्ती निवारण , मदत व पुनर्वसन विभाग यांचे आदेश क्रमांक DMI/२०२०/CR ९२/DisM-१, दिनांक १४.१०.२०२०

वरील विषयाबाबत महाराष्ट्र शासनाच्या दिनांक १४.१०.२०२० रोजी प्रसिध्द केलेल्या Easing of Restrictions and Phasewise opening of Lockdown (Mission Begin Again) अंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रातील संस्थांमध्ये Research Scholar (Ph.D) व Post Graduate Students यांना जिथे Laboratary / Experimental Works करणे आवश्यक आहे त्यांना दिनांक १५.१०.२०२० पासून परवानगी देण्यात आलेली आहे.

सदर परवानगीच्या अनुषंगाने संबंधित संस्था व संबंधित विद्यार्थ्यांसाठी कोविड १९ च्या पार्श्वभूमीवर अंमलात आणावयाची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) सोबत पाठविण्यात येत आहे. सदर सूचना व कार्यपध्दतीचे काटेकोटपणे अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधित संस्थांना आजच निर्गमित करण्यात याव्यात .याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास तात्काळ सादर करावा.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

C:\Users\Admin\Downloads\Unlock order 15.10.2020 guidence.docx

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक 14.10.2020 रोजी प्रसिध्द केलेल्या Easing of Restrictions and Phase wise opening of Lockdown (Mission Begin Again) अंतर्गत उच्च व तंत्रशिक्षण क्षेत्रातील संस्थांमध्ये Research Scholar (Ph.D) व Post Graduate Students यांना Laboratory / Experimental Works करण्यासाठी दिनांक 15.10.2020 पासून परवानगी देण्यात आलेली आहे. सदर बाबीच्या परवानगीच्या अनुषंगाने संबंधित संस्था व संबंधित विद्यार्थ्यांसाठी कोविड-19 च्या पार्श्वभूमीवर खबरदारी घेण्यासंदर्भात प्रमाणित कार्यपध्दती (SOP) खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

*संदर्भ : (१)शासन आदेश महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग यांचे आदेश क्रमांक DMU/2020/CR92/DisM-1, दिनांक 14.10.2020*

1. सर्व संबंधित तंत्रशिक्षण संस्थांनी राज्य / केंद्र शासनाने कोविड -१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेली मार्गदर्शक तत्वे , विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी / स्थानिक प्रशासन यांनी कोविड -१९ संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश यांचे कटाक्षाने पालन करणे आवश्यक आहे. या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सर्व सूचनांचे अनुपालन संबंधित संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांनी करणे आवश्यक आहे.
2. संस्थेच्या प्रवेशद्वारावरच स्पर्श विरहित थर्मोमीटर आणि ऑक्झिमीटर द्वारे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांची तपासणी बंधनकारक असेल.
3. संस्थेत येणा-या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांना कोविड 19 ची लक्षणे (Fever,Cough,difficulty in breathing इ.) आढळून आल्यास त्यांना संस्थेमध्ये प्रवेश देण्यात येऊ नये.
4. सर्व संबंधित तंत्रशिक्षण संस्थांमध्ये काम करणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांनी मास्क परिधान करणे व मास्कचा वापर अनिवार्य असल्याच्या सूचना त्यांना प्रवेशद्वारावरच देणे आवश्यक राहील.
5. सर्व संबंधित तंत्रशिक्षण संस्थांमध्ये काम करणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांनी मास्क लावणे अनिवार्य आहे.
6. सर्वांसाठी आरोग्य सेतू ॲप चा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात यावे व शक्यतो या ॲपचा वापर आवश्यक करण्यात यावा.
7. सर्व संबंधित तंत्रशिक्षण संस्थांमध्ये काम करणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांचेसाठी सॅनिटायझर / हात स्वच्छ धुण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच संस्थेच्या प्रसाधनगृहांमध्ये व सार्वजनिक वापराच्या ठिकाणी पुरेशा प्रमाणात सॅनिटायझर / हात स्वच्छ धुण्यासाठी साबण याची व्यवस्था करणे अनिवार्य आहे.
8. संस्थेच्या परिसरामध्ये थुंकण्यास प्रतिबंध असल्याच्या सूचना ठळकपणे प्रदर्शित करण्यात याव्यात.
9. सर्व संबंधित तंत्रशिक्षण संस्थांमध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांना वापरासाठी निश्चित केलेले पॅसेज, प्रसाधनगृहे , लिफ्ट, चौकशी काउंटर या ठिकाणांचे रोज साधारणतः दोन ते तीन तासाचे अंतराने निर्जंतुकीकरण आवश्यक असेल.
10. संस्थेतील प्रयोगशाळा / संशोधन कक्ष सुरू करण्यापूर्वी डॉक्टरेट अभ्यासक्रम प्रयोगशाळा, इतर सामान्य वापरासाठीचे क्षेत्रासह सर्व कार्यक्षेत्रांची स्वच्छता सोडियम हायपोक्लोराइट सोल्यूशनसह करावी, विशेषतः वारंवार स्पर्श केलेल्या पृष्ठभागावर लक्ष देण्यात यावे.
11. संस्थेत ज्या ठिकाणी वातानुकुलित यंत्रणा आवश्यक असेल अशा ठिकाणी तापमान 24 ते 30 अंश सेल्सिअस व हवेची आर्द्रता (Humidity) 40-70% इतकी असावी. तसेच सर्व ठिकाणी हवा स्वच्छ व खेळती राहील याची दक्षता घेण्यात यावी.

12. सर्व संबंधित तंत्रशिक्षण संस्थांमध्ये काम करणाऱ्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांचे कडून सामाजिक अंतर नियमांचे पालन व्हावे या दृष्टीने आवश्यक ते व्यवस्थापन, पुरेसे अंतर ( 6 feet ) ठेवून आवश्यकतेनुसार रांगेत उभे राहण्यासाठी वर्तुळ आखणी या तरतुदी संबंधित संस्थेने कराव्यात .
13. गर्दी टाळण्याचे दृष्टीने तसेच सामाजिक अंतर राखण्याच्या दृष्टीकोनातून विद्यार्थी /अभ्यागत यांचे साठी पुरेशा प्रमाणात मार्गदर्शनासाठी दिशादर्शक (Sign बोर्डस / पोस्टर्स ) असावेत
14. संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांनी काय करावे आणि काय करु नये याबाबत स्पष्ट सूचना दर्शनी भागात प्रदर्शित कराव्यात.
15. संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांचेकरिता आपत्कालिन प्रसंगी आवश्यक असलेले मदत क्रमांक (Help Line) संस्थेमध्ये दर्शनी भागात प्रदर्शित करण्यात यावेत.
16. संबंधित ठिकाणच्या स्थानिक प्रशासन / जिल्हाधिकारी यांनी जर एखाद्या संस्थेचा परिसर कंटेनमेंट क्षेत्र घोषित केला असेल तर सदर संस्थेतील विद्यार्थ्यांचा प्रवेश तात्काळ बंद करण्यात यावा.
17. कंटेनमेंट झोनमध्ये राहणारे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , विद्यार्थी व संस्थेमध्ये येणारे अभ्यागत यांना संस्थेत येण्याची परवानगी देण्यात येऊ नये. तसेच कंटेनमेंट झोनमध्ये न जाण्याबाबत सल्ला देण्यात यावा.
18. प्रत्येक संस्थेने त्यांचे स्तरावर विविध प्रयोगशाळा व परिसरातील इतर भागासाठी संस्थास्तरावर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी व अभ्यागत यांचेकरिता शासन तथा स्थानिक प्रशासनाकडून कोविड 19 च्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित होणा-या सुचना तसेच मार्गदर्शक तत्वांच्या आधारे सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात व त्या दर्शनी भागात प्रदर्शित कराव्यात.
19. संस्थाप्रमुखांनी त्यांच्या संस्थेमध्ये वरीलप्रमाणे सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

*****x******